महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)

क्र.मऔविम/मावतं विभाग/ D56099 /२०१६

उद्योग सारथी
मरोळ औद्योगिक क्षेत्र,
महाकाली गुंफा मार्ग,
अंधेरी (पूर्व), मुंबई-९३
दिनांक : 26 OCT 2016

## परिपत्रक

विषय : महामंडळाच्या आयटी इमारतीचे आयटी प्रयोजना व्यतिरिक्त अन्य प्रयोजनामध्ये रुपांतर करणेबाबत.

नाशिक (अंबड), अहमदनगर, लातूर, अमरावती, सोलापूर (चिंचोली) येथील इमारतीतील सर्व गाळे १५ वर्षापासून रिक्त आहेत या आयटी इमारतींचा वापर झालेला नसून या आयटी इमारती भाडयाने तसेच विक्री करणेबाबत महामंडळाने वारंवार निविदा मागवून विक्री करणेचा प्रयत्न केला परंतु निविदेस प्रतिसाद प्राप्त झालेला नाही. निविदा कालावधी वाढवून सुध्दा या निविदांना सकारात्मक प्रतिसाद प्राप्त झालेला नाही.

महामंडळाच्या धोरणानुसार आयटी प्रयोजनासाठी बांधणेत आलेल्या इमारतीचा वापर अन्य प्रयोजनासाठी करणे नियमानुसार शक्य नसलेने तसेच वरील इमारती बाधण्यासाठी महामंडळाचा झालेला खर्च विचारात घेता सदर इमारतील बऱ्याच कालावधीपासून विनावापर बंद स्थितीत असल्यामुळे महामंडळास कुठलाही महसूल प्राप्त होत नसून सदर इमारतीवरील देखभाल दुरुस्तीचा खर्चाचा आर्थिक बोजा महामंडळावर पडत आहे याकरीता इमारतीचा आयटी व्यतिरिक्त अन्य प्रयोजनासाठी वापर करणेबाबतची बाब महामंडळाची दिनांक ३०/०७/२०१६ रोजीच्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये. सादर करणेत आली होती सदर बैठकीमध्ये पुढील प्रमाणे ठराव पारीत करणेत आला आहे.

**बाब क्र. २०, ठराव क्र ५५९९**

ठराव करण्यात येतो की, प्रस्तावात नमूद केलेल्या माहिती तंत्रज्ञान उद्यान अंबड (नाशिक) लातूर, अहमदनगर, अमरावती व चिंचोली (सोलापूर) येथील आयटी प्रयोजनाकरिता बांधण्यात आलेल्या इमारतीचा वापर आयटी व्यतिरिक्त अन्य प्रयोजनासाठी करणेकरीता सदरच्या इमारती आयटी प्रयोजनामधून वगळण्यास या ठरावाव्दारे मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

महामंडळाच्या अखत्यारित असलेल्या आयटी इमारती पैकी नाशिक (अंबड), अहमदनगर, लातूर, अमरावती, सोलापूर (चिंचोली) या इमारती आयटी पार्कमधुन वगळण्यात येवून सदर इमारतीचा आयटी व्यतिरिक्त अन्य प्रयोजनासाठी वापर करण्यासाठी या परिपत्रकान्वये मान्यता देण्यात येते.

सदरहु परिपत्रक मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सह मुख्य कार्यकारी अधिकारी (मा/तं)
मऔविम, मुंबई-९३

प्रति,

१. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केन्द्र (डब्ल्यु.टी.सी), कफ परेड, मुंबईसर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. विकास आयुक्त, उद्योग संचालनालय, मुंबई.
३. सह मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम.
४. सह मुख्य कार्यकारी अधिकारी (मा/तं), मऔविम.
५. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
६. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
७. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
८. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
९. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे/औरंगाबाद/नागपूर.

midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

१०. महाव्यवस्थापक(भूमी)/महाव्यवस्थापक(भूसंपादन)/व्यवस्थापक(भूमी१/२)/मऔविम, मुंबई.
११. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
१२. व्यवस्थापक (भूसंपादन १/२) मऔविम, मुंबई.
१३. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
१४. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम, मुंबई.
१५. म.औ.वि.महामंडळाचे सर्व संचालक.
१६, सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केन्द्र.
१७. सर्व औद्योगिक संघटना.

midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in